## निवेदन

मी या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, "प्रि. गोपाळ गणेश आगरकर (१८५६ - १८९५) : सामाजिक विचार आणि समाजसुधारणा" हा प्रबंध माझी संशोधन मार्गदर्शक डॉ. अरुणा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वतः लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी विद्यापीठास सादर केला आहे.

(तानाजी नाथुराव कदम)
अभ्यासक

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : १४.१२.८७

II

## प्रमाणपत्र

श्री. तानाजी नाथुराव कदम यांनी इतिहास विभागातील एम.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांजकडे सादर करावयाचा "प्रि. गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८९५) : सामाजिक विचार आणि समाजसुधारणा" हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. श्री. कदम यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

(डॉ. अरुण भोसले)
प्रपाठक,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : १४-१२-८८

## प्रस्तावना

प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर यांच्यासारख्या सुधारणावादी समाजसुधारकावर आजपर्यन्त अनेक जणांनी आपले विचार मांडलेले आहेत. आगरकरांच्या बाबतीत विचार करत असताना प्रत्येक ग्रंथकर्त्याने आणि आगरकरांच्या अभ्यासकांनी वेगवेगळ्या पद्धतीने आगरकरांच्या जीवनावर प्रकाश टाकलेला आहे. य.दि.फडके यांच्यासारखे सुप्रसिद्ध संशोधक, डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे यांच्यासारखे सामाजिक विचारवंत आणि एकोणिसाव्या शतकातील विविध विषयावर बुद्धिवादी दृष्टिकोनातून आपले विचार मांडणारे प्रा. मं.बा. सरदार यांनी आणि इतर अनेक थोरामोठ्यांनी आगरकरांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर लेखन केलेले आहे. टिळक आणि आगरकर यांच्या बाबतीत विचार करताना असे दिसून येते की, आतापर्यन्त या दोघांनाही मानणाऱ्या अनेक मान्यवरांनी या दोन्ही देशभक्तांवर आपले विचार मांडलेले आहेत. मात्र हे विचार मांडत असताना टिळक भक्तांनी आगरकरांना कमी लेखणारी मते मांडलेली आहेत तर आगरकर भक्तांनीही आगरकरांच्या बाबतीत लेखन करत असताना टिळकांना आगरकरांपेक्षा कमी लेखण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पेशवाईच्या राज्यकारभारास कंटाळलेल्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य प्रजेने इंग्रजी राजवटीचे शांती आणि सुखाचे अनुभव पाहून त्या राजवटीचे स्वागत केले. नवीन राज्यात होणाऱ्या सुधारणामुळे आणि शिक्षणामुळे सामान्य प्रजा दिपून गेली आणि त्यामुळेच त्याकाळातील प्रजेला ब्रिटिशांचे राज्य हे ईश्वरी प्रसादाप्रमाणे वाटू लागले. ब्रिटिश अमदानी पूर्वीच्या काळात रुढी व अंधश्रद्धा यांचा समाजावर अपरिमित पगडा असल्याने धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये सर्वप्रकारचे अराजक माजले होते. विविध माध्यमातून समाजप्रबोधन घडवून आणण्याचे कार्य त्या काळातील समाजधुरिणासमोर होते. विविध मार्गांनी त्या काळातील समाजामध्ये चैतन्य निर्माण करण्याचे कार्य लोकहितवादी, जोतीबा फुले, विष्णु शास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, न्या. रानडे वगैरे प्रभृतींनी केले. त्यांनी आपापल्या नोकरीच्या जबाबदाऱ्या

आणि मर्यादा सांभाळून जमेल तेवढे समाजकार्य करण्याचा प्रयत्न केला. मात्र चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांनी लोकजागृतीसाठी नवीन मार्ग स्वीकारला. जनतेमध्ये स्वातंत्र्यप्रेमाची भावना व पारतंत्र्याबद्दल चीड निर्माण करण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रे आणि शाळा यांची सुरुवात करून त्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणण्याचे महान कार्य केले.

समाजप्रबोधन करण्यासाठी आगरकरांनी नवविचार प्रवर्तनाबरोबर कालबाह्य आणि हानिकारक अशा कल्पनांच्या रूढींचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले. आगरकरांना समाजामध्ये जे जे दोष दिसले त्यावर त्यांनी निर्भिडपणे हल्ला करून ते दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. समाजाचे प्रबोधन घडवून आणण्यासाठी त्यांनी निषेधपर आणि विधायक अशा दोन्ही स्वरूपांचे लेखन केले आहे. समाजातील दोषांवर न्यायनिष्ठूरपणे सतत प्रहार करीत राहिल्याशिवाय आपल्या मनावरील त्यांची पकड सैल होणार नाही याची आगरकरांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी लोकांच्या स्तुतिनिंदेची पर्वा न करता आपले लेखनाचे कार्य शेवटपर्यंत धिटाईने चालू ठेवले.

उच्च शिक्षण घेऊन सरकारी नोकरी करीत राहिले आयुष्य सुखसमाधानाने घालवायचे अशी पद्धत टिळक, आगरकरांच्या अगोदरच्या पिढीतील सुशिक्षित मंडळींची होती. असे पाहिले तर लोकहितवादी, रानडे, भांडारकर, मोडक, तेलंग वगैरे मंडळींनी परक्या सरकारची नोकरी व्यवस्थित करून लोककल्याणाचे कार्यसुद्धा सुरू केले. हे जरी खरे असले तरी पण ऐन तारुण्यात जाणूनबुजून आर्थिकदृष्ट्या असुरक्षित जीवन स्वीकारण्याचा निर्णय टिळक, आगरकर, गोखले, आपटे इत्यादी तरुणांनी घेतला होता. हे सर्व जण बहुतेक गरीब कुटुंबात जन्मले होते, वाढले होते. त्याचप्रमाणे वाढत्या प्रापंचिक जबाबदाऱ्या, अडचणी, प्रकृती अस्वास्थ्य अशा विविध समस्यांना तोंड देत आणि अहोरात्र कामे करून उत्पन्नाचा व खर्चाचा मेळ घालीत त्यापैकी अनेकांनी अपार कष्ट केले. व लहान वयातच आपली जीवनयात्रा संपविली. टिळकांप्रमाणे लोकहितासाठी स्वार्थत्याग

करण्याचे उदाहरण या मंडळींनी घालून दिले. तेव्हा या सर्वांचे मोठेपण हे आपल्या इतिहासात नोंदले गेले आहे.

आगरकरांना कॉलेजचे शिक्षण घेत असतानाच दम्याचा विकार जडला होता. तेव्हा दारिद्र्याच्या जोडीला दमाही आगरकरांच्या संगतीला आला. दमा आणि दारिद्र्य हे दोन घटक आगरकरांच्या पाचवीलाच पुजलेले होते. पण अशाही परिस्थितीत दम्याशी आणि दारिद्र्याशीही झुंज देत आगरकरांनी आपल्या आयुष्याच्या अंतापर्यन्त समाज प्रबोधनाचे कार्य केले तसे पाहिले तर आगरकरांना १८५६ ते १८९५ असे फक्त ३९ वर्षांचेच आयुष्य लाभले. पण तेवढ्या कालखंडात स्वतःचे शिक्षण पूर्ण करून राहिलेल्या आयुष्यामध्ये समाजाला आपल्या विचारांच्या माध्यमातून जागृत करण्याचे महान कार्य त्यानी केले. अवघ्या ३९ वर्षांच्या आयुष्यामध्ये देखील आपणाला समाजाला जे काही सांगायचे होते ते सर्व सांगून झालेले आहे आणि आता मरणास मोकळीक आहे असे कर्तव्यपूर्तीचे उद्गार आगरकरांनी आपल्या मृत्यूपूर्वी काढले होते.

गोपाळ गणेश आगरकर हे कट्टर समाजसुधारक होते. ते प्रखर बुद्धी-प्रामाण्यवादी होते. ' इष्ट असेल तेच बोलणार आणि साध्य असेल ते करणार ' हे त्यांचे ब्रीद होते. त्यांनी मांडलेल्या पुरोगामी विचारामुळे त्यांना मानहानी, छळ, उपेक्षा यांना तोंड द्यावे लागले. सनातन्यांनी या कट्टर समाजसुधारकाची त्यांच्या ह्यातीतच प्रेतयात्रा काढली. तत्कालीन समाजाकडून आगरकरांचे अपेक्षित कौतुक झाले नाही. आगरकरांच्या ज्या सामाजिक विचारांमुळे आणि त्यानी पुरस्कारिलेल्या ज्या सामाजिक सुधारणामुळे ते तत्कालीन समाजात उपेक्षित राहिले. त्यांचा त्या काळाच्या संदर्भात वस्तुनिष्ठ अभ्यास करणे हे या प्रबंधाचे उद्दिष्ट आहे. गोपाळ गणेश आगरकर यांचा सामाजिक विचार आणि त्यांनी पुरस्कारिलेल्या सामाजिक सुधारणा यांचा अभ्यास प्रामुख्याने आगरकरांचे प्रकाशित साहित्य, इ.स. १८८१ ते १८८७ या कालावधीत त्यांनी केसरीतून केलेले लेखन आणि सुधारकातील

त्यांचे विविध लेख यांच्या आधारे केला आहे. या अभ्यासासाठी आगरकरांवर यापूर्वी प्रा. ग.बा. सरदार, डॉ. पु.ग. सहस्रबुद्धे, प्रा. भी.ना. बनहट्टी, सुप्रसिद्ध साहित्यिक के. वि.स.खांडेकर, डॉ. य.दि. फडके इत्यादी अभ्यासकांनी केलेल्या लेखनाचा आढावा घेतला आहे. तसेच विविध मराठी आणि इंग्रजी नियतकालिकातून आगरकर व्यक्ती आणि कार्य यासंबंधी वेळोवेळी प्रकाशित झालेल्या मान्यवर विद्वानांच्या लेखांचा या प्रबंधासाठी अभ्यास केला आहे. आगरकरांच्या पत्नी यशोदाबाई यांनी आपल्या आयुष्याच्या सायंकाळी कथन केलेल्या आगरकरांबद्दलच्या आठवणी स्त्री मासिकाच्या १९२४ सालच्या मे ते सप्टेंबरच्या अंकात पांच लेखात प्रकाशित झाल्या आहेत. त्या प्रस्तुत अभ्यासकास अत्यंत उपयुक्त ठरल्या. याप्रमाणे प्रस्तुत प्रबंधात गोपाळ गणेश आगरकर यांच्या सामाजिक विचारांचा आणि समाज सुधारणांचा त्या काळाच्या संदर्भात उपलब्ध प्रकाशित प्राथमिक आणि दुय्यम दर्जाच्या साधनांचा वापर करून अभ्यास केला आहे.

एम.फिल. पदवीसाठीचा प्रबंध तयार करताना वर उल्लेखलेल्या साधनांचा शोध घेताना व त्यांचा अभ्यास करताना मला अनेक व्यक्ती आणि संस्था यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्या सर्वांचा येथे नामोल्लेख करणे विस्तारभयास्तव अशक्य आहे. तथापि त्यातील काही व्यक्ती आणि संस्था यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. सर्वप्रथम मी माझे संशोधन मार्गदर्शक डॉ.अरुण भोसले, प्रपाठक, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे आभार मानतो. मला माझ्या अभ्यासात त्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच मी हे कार्य करु शकलो. अवघडात अवघड असणारी गोष्ट सोपी आणि सुटसुटीत करणे हे केवळ त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मला शक्य झाले. त्याचप्रमाणे या कामाच्या पूर्ततेसाठी माझ्यासाठी त्यांनी जास्तीत जास्त वेळ दिला. त्यांनी माझ्या बाबतीत दाखविलेले प्रेम, आपुलकी आणि सहकार्य या सर्व गोष्टी-मुळेच मला काम करणे शक्य झाले. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. तसेच मराठी विभागाचे प्रपाठक डॉ. ल.रा. नसिराबादकर यांचे देखील मला वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मला हे संशोधन कार्य करण्यास संधी उपलब्ध करून देण्यात आमच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एस. अनहट्टी यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी मला हे कार्य करण्यास एकसारखे प्रोत्साहन दिले. विद्या विकास मंडळ या आमच्या संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष मा. यशवंतरावजी काळाप यांनीही मला माझ्या अभ्यासासाठी इतर कामातून मोकळीक देऊन वेळ उपलब्ध करून दिला आणि माझ्या संशोधन कार्यास बहुमोल सहकार्य केले.

मला माझ्या अभ्यासासाठी अनेक संस्थांनी, ग्रंथालयांनी आणि त्यांच्या प्रमुखांनी फार मोठे सहकार्य केले. यात प्रामुख्याने शिवाजी विद्यापीठाचे बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, आमच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे ग्रंथालय व ग्रंथपाल प्रो. डी.एस. गायकवाड, केसरी ग्रंथालय, टिळक स्मारक मंदिर, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय आणि राजाराम कॉलेजचे डॉ. बाळकृष्ण ग्रंथालय यांचे बहुमोल सहाय्य झाले. माझ्या संशोधनास आवश्यक असे अनेक उपयुक्त ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रांचे जुने अंक, त्यांच्या मायक्रोफिल्म्स असे विविध साहित्य मला उपलब्ध झाले. तेव्हा त्यांचेही ऋण मी विसरू शकत नाही.

या प्रबंधाचे टंकलेखनाचे काम माझे मित्र प्रो. काळे यांनी अतिशय टापटिपीत आणि तत्परतेने केले याबद्दल त्यांचे मानावेत तेवढे आभार थोडेच आहेत.

दिनांक : (तानाजी कदम)

स्थळ : कोल्हापूर